# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३९०/२०२४ दिनांक २४/१०/२०२४

## प्रेस नोट

**रुद्र शिवसागर हॉटेल, रेंज ऑफीस वसई पुर्व ता.वसई जि.पालघर येथे कारवाई करुन अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेणाया महीला आरोपीस अटक करुन दोन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश**

रुद्र शिवसागर हॉटेल प्रॉफीट सेंटर बिल्डींग रेंज ऑफीस जवळ वसई पुर्व ता.वसई जि.पालघर याठिकाणी एक महीला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिहाईक व दोन पंच तसेच असे सदर ठिकाणी जावुन दि.१८/१०/२०२४ रोजी कारवाई करुन महीला वेश्यादलाल **नेहा मैराज खान वय २७ वर्षे** हिस अटक करुन दोन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेश्यादलाल नेहा हीचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता त्याने सांगितले की, मी एका मुलीचे ३०००/- रु. घेते आपणास कबुल असेल तर रुद्र शिवसागर हॉटेल प्रॉफीट सेंटर बिल्डींग रेंज ऑफीस जवळ वसई पुर्व येथे येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह रुद्र शिवसागर हॉटेल येथे गेले असता वेश्यादलाल **नेहा मैराज खान** हीने बोगस गिहाईकास दोन महीला दाखवुन त्यातली एक पसंद करुन माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिहाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे तीस पैसे दिले असता बोगस गिहाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महीला दलाल आरोपीत नामे **नेहा मैराज खान वय २७ वर्षे** हिस ताब्यात घेतले. व दोन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे **नेहा मैराज खान वय २७ वर्षे रा. नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर,मुळ रा.बिहार** हीने भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३(२) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे वेश्यागमनाकरीता ३०००/-रु. घेते व त्यातील काही रक्कम पिडीत महीलांना देत असते.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद महीला दलाल आरोपीत हीस अटक करुन वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. ५३५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३(२) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत हिचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री.अविनाश अंबुरे,पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त श्री.मदन बल्लाळ (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/गवई, पोहवा/०५०२८ किणी, मपोहवा/०५००४ डोईफोडे, पोहवा/०७०५५ शेटये, चालक पोहवा/०७०६६ पागी, मपोहवा/०८००३ तिवले, पोहवा/१०००२ शिंदे, मपोशि/१६०९५ पाटील सर्व नेम.अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

----000----